आर्थिक वर्ष सन २०१९-२० करीता शासकीय आश्रमशाळांचे बांधकाम लेखाशीर्ष (४२२५ ११०९) या अंतर्गत निधी वितरण

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/ प्र.क्र. ५६ /कार्यासन.६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २०/०८/२०१९

वाचा

१) शासन परिपत्रक क्रमांकः वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.०१.०४.२०१९
२) शासन परिपत्रक क्रमांकः वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.८.०७.२०१९.
३) शासन ज्ञापन क्र. आविवि, क्र.बीयुडी-२०१९/प्र.क्र.५६/का-६ दि.२७/०५/२०१९.
४) शासन निर्णय क्र. आविवि, क्र.बीयुडी-२०१९/प्र.क्र.५६/का-६ दि.२६/०७/२०१९
५) बांधकाम व्यवस्थपन कक्ष, (आ.वि.वि.) यांची नस्ती क्र. अर्थवि-२०१९/प्र.क्र.५७/बांव्यक.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षात मागणी क्रमांक टी-६ मुख्य लेखाशिर्ष ४२२५ , अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, ०२ अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, अंतर्गत (०१) (१७) आश्रमशाळांचे बांधकाम (४२२५ ११०९), ५३- मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वर्षाकरीता रु. १६५००.०० लाख इतकी तरतुद अर्थसंकल्पीत आहे. त्यापैकी माहे एप्रिल ते जुन व जुलै ते सप्टेंबर २०१९ करीता संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील शासन ज्ञापन/ निर्णयाद्वारे यापुर्वी ८२४४.६७ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे.

आश्रमशाळेच्या बांधकामाकरीता माहे जुलै ते सप्टेंबर २०१९ करीता उपरोक्त संदर्भाधीन क्र. ५ येथील निधी मागणी प्रस्तावास अनुसरुन सन २०१९-२० या वर्षातील अर्थसंकल्पीत तरतुदीमधुन खाली नमुद केल्यानुसार **१ कामास** रकाना ६ नुसार एकूण **रु.२००.०० लाख** इतका निधी खालीलप्रमाणे नियंत्रक अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, **नागपुर** यांना (BEAMS) अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली वर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	कामाचे नाव	प्र.मा./सु.प्र.मान्यता किंमत	मार्च ,२०१९ अखेरचा खर्च	सन २०१९-२० मध्ये यापुर्वी वितरीत	सदर शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येत असलेला निधी	नियंत्रक अधिकारी
					(रु.लाखात)	
१	२	३	४	५	६	७
१	कोरची ता.कोरची जि.गडचिरोली येथील मुलांचे वसतीगृह बांधकाम करणे	१०८४.००	३.१५	०.००	**२००.००**	अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ) , नागपूर.

२. सदर निधीचे वितरण खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी वरीलप्रमाणे नमुद कामांवर प्रशासकीय /सुधारीत प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेतच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.

२) वरीलप्रमाणे नमुद केलेल्या कामांवरच सदरील निधी खर्च होईल याची दक्षता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी

३) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपुर यांचे मार्फत सदर बांधकामांस वेळोवेळी भेटी देण्यात येवून कामाचा दर्जा, गुणवत्ता यांची तपासणी करावी व वितरीत करण्यात आलेला निधी योग्य रित्या खर्च होत आहे याची दक्षता घ्यावी.

४) वितरीत करण्यात आलेला निधी माहे ३१ मार्च, २०२० अखेर खर्च होणे आवश्यक आहे.

५) सदर वितरीत निधीमधुन झालेला खर्चाचा अहवाल नियंत्रक अधिकारी यांनी एकत्रित करुन तो विहित प्रपत्रात शासनास सादर करावा.

६) वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित शासन परिपत्रकामधील विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी यांची राहील.

३. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४१८५०२२२९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f05a6913f9dee1f453c9a1c5a89d8c4897737ba8e4ac0edf3f2c6e69e25f4108, cn=Ravindra Digambarrao Aute
Date: 2019.08.20 16:51:25 +05'30'

(रविंद्र औटे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खासगी सचिव , मंत्रालय, मुंबई..
२. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, मंत्रालय, मुंबई. रविंद्र दि. औटे
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर.
८. प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र, गडचिरोली.
९. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ,नाशिक/ नागपूर.
१०.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग,धुळे/चंद्रपुर.
११.महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१२.अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५.वित्त विभाग (व्यय १४/अर्थ-१९), मंत्रालय, मुंबई-३२
१६.निवड नस्ती (का-६) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.